
REIKI VIDYA NIKETAN

सर्वे: सन्तु निरामया:

# रेकि ब्रह्म

वर्ष ९वे अंक ४था । जानेवारी २०२१



संपादकिय




# संमिश्रित भावनांनी २०२०ला निरोप..

बापरे! २०२०– काय वर्ष पण होते ते! २०२० सुरूवातीपासूनच काहीतरी वेगळे आहे हे माझ्यासकट बऱ्याच लोकंना समजून आले होते. २०२० ह्या आकड्यामध्येच काहीतरी गूढ आहे एवढे निश्चित. अंकशास्त्राचे अभ्यासक आहेत त्यांना हे ज्ञात असेल कि २ ह्या क्रमांकावर चंद्राचा प्रभाव असतो आणि २०२० ह्या अंकामध्ये चंद्राशिवाय कोणताच दुसरा क्रमांक किंवा दुसरा कोणता ग्रहाचा प्रभाव नाही, चंद्र म्हणजे मानसिकता आणि मुख्यत: भावना. भावनांना जर मनाची आणि बुद्धीची जोड नाही मिळाली तर मानवाचे आयुष्य अतिभावनाशील आणि अतिसंवेदनाशील बनते व व्यक्तीमत्वामध्ये एक विकृति येते. जे एका मानवाला लागू पडते त्याचेच प्रतिबिंब समाजामध्ये पडत असते कारण समाज म्हणजे दुसरे तिसरे काही नसून माणसांचा समूह असतो. परंतु हे झाले अंकशास्त्राचे निदान. दुसऱ्या दृष्टीतून पाहिले तर हे लक्षात येते कि सिद्धांना हे माहित होते किंवा आहे कि २०२० पासून २०२२ पर्यंतचा काळ हा साधनेच्या दृष्टीने कसोटीचा आहे. त्यांच्या ह्या माहित असण्याला कोठेही शास्त्राचा किंवा विज्ञानाचा आधार असणे गरजेचे नसते. विश्वचेतनेच्या कुशीत बसून अनुभवलेल्या त्यांच्या जाणिवा हेच विज्ञानाचे मूळ स्वरूप आहे.

२०२०ने खूप माणसांचे बळी घेतले म्हणून ते वाईट होते का? सामान्य माणसाला, ज्याला अध्यात्मिकतेचा ओझरता स्पर्शही झालेला नसताना आत्मचिंतन करण्याला भाग पाडणाऱ्या आणि आपल्याच सर्व कर्मांच्या बाबतीत चांगल्या वाईटाचा, पाप–पुण्याचा विचार करायला लावणारे २०२० हे चांगले होते? ज्या आपल्याच क्रिया–कर्मांची दिशाच चुकत होती त्यांच्याबद्दलचा सारासार विवेक सामान्य माणसाच्या मनात तयार करून आपण निसर्गाच्या पासून किती दूर गेलो आहोत याची जाणिव करून देऊन आपल्या अफाट, दिव्यत्वाच्या डोहात कधीच न डोकावल्यामुळे आपल्याच सामर्थ्याला वंचित राहणाऱ्या सामान्य माणसाला अंतर्मुख केले ते २०२०नेच.

कोरोनाने मानवाच्या आंतरिक गांठी तर तोडल्याच पण मानवाला आलेला अहंकाराचा उन्माद सुद्धा बऱ्यापैकी जमिनीवर आणला. आयुष्याकडे बघण्याचा दृष्टीकोनच कोरोनाने आंतर्बाह्य बदलायला सुरूवात केली. हे अतर्क्य होते. मला एक विश्वास बालपणापासून होता आणि तो म्हणजे परमेश्वराच्या मनात आले तो असे काहीतरी करू शकतो कि एका क्षणात माणसाचे दुष्ट विचार नष्ट होऊन तो मांगल्याने भरून जाऊ शकतो. तो विश्वास काही प्रमाणात का होईना आता जागवला गेला. ही तर केवळ एक झलक होती असे मी मानेन. अमेरिकेतील सी.एन्. एन्. ह्या टीव्ही चॅनेलवरील एका वार्तालापात एक भारतिय वंशाचा अमेरिकन डॉक्टर हताशपणे रडताना मी पाहीला. तो ज्येष्ठ आणि नामांकित डॉक्टर सांगत होता कि "खरे सांगायचे तर रोग्यांना बरे करण्यापेक्षा आमच्या शास्त्राचा भर हा नेहमीच रोग्याचा मृत्यु लांबवणे हाच होता. एखादा रोगी मृत्युशय्येवर पडला असता त्याच्या मृत्युला आमच्या शास्त्राचे भय दाखवून दूर ठेवणे एवढेच आम्ही करत असतो. परंतु ह्या कोरोनाने आमच्या

डोळ्यादेखत रूग्णांना मृत्युच्या हातात सोपवल्याने आम्ही हताश झालो आहोत. रुग्णाला आणखी दोन-चार महिने मिळवून देण्याचे समाधानही आता आम्हाला मिळत नाही. आमचे शास्त्र आता हरले."

आतापर्यंतच्या साथी आणि महामारी सांभाळणे हे फारसे कठीण नव्हते. जरी ह्या रोगांनी बरेच बळी घेतले. कदाचित स्पॅनिश फ्लू, प्लेग इत्यादि भयंकर साथींनी विसाव्या शतकाच्या सुरूवातीला कोरोनापेक्षा जास्तच माणसांचे बळी घेतलेही असतील. परंतु त्या वेळेला परिस्थिती वेगळी होती. बळी पडणाऱ्यांच्या आयुष्याला आधुनिक जगाच्या मनात विशेष महत्व नव्हते. मरणारे हे विकसनशील, गरीब देशांतील नागरिक होते. गरिबी, वाईट संवयी, अस्वच्छता, निरक्षरता, गावठीपणा इत्यादिंवर खापर फोडून आपण मोकळे व्हायचो. प्रगतिशील, स्वतःला आधुनिक म्हणवणाऱ्या देशांचे फारसे काही नुकसान झाल्याचे दिसायचे नाही आणि इतरांना नगण्य व अप्रगत जीव असे हिणवणाऱ्या देशांना ह्यात फारसे काही विपरित दिसले नाही आणि त्यांनी त्यांची दखलही कधी घेतली नाही. नैसर्गिक आपत्तिही आपण मोठया प्रमाणात झेलल्या. भूकंप, सुनामिज, महापूर, वादळे, तुफाने यांनीही केलेली मनुष्यहानी आणि निसर्गाचीही वाताहात आपण सराईतपणे स्वीकारली. दैवी कोप किंवा नैसर्गिक घटना म्हणून त्यांचा स्वीकार करणे सोपे होते. त्यात मनुष्याच्या अहंकाराला कोठेच धक्का लागत नव्हता. परंतु ह्यावेळेला आपण जे काही पाह्यले किंवा पाहत आहोत, त्यात एक गोष्ट प्रकर्षाने दिसते ती म्हणजे ह्या सर्व पडझडीत निसर्ग मात्र तंदुरूस्तच नव्हे तर आणखीच मजबूत आणि सुंदर जाणवायला लागला आहे. आकाशाची पोकळी अतिशय सुंदर महिरप घेऊन उभी आहे. सगळी वृक्षवल्ली हिरव्यागार वस्त्र-प्रावरणामध्ये आनंदाने थुई-थुई नाचते आहे. पक्षी आणि पशु माणसाच्या कर्तृत्वाच्या (?) बंधनांतून मुक्त होऊन घराघरात बंदिस्त बसून तोंड झाकून घाबरलेल्या माणसांकडे पाहून गालातल्या गालात हसत असताना भासतेय, सगळेच विपरित जे कधी घडले नव्हते.

दुसरी बाजू पाहू गेल्यास लक्षात येते कि मानवी घडामोडी पूर्णपणे संपूर्ण विश्वात थांबून गेल्यात असे दृश्य मानवाने ना कधी पाहीले ना ऐकले होते. माणसाच्या लक्षात येत होते कि जे आपण आतापर्यंत करत होतो ते करायची आवश्यकताच नव्हती. हेही लक्षात येत होते कि आपली आंतरिक अस्ताव्यस्तता बाहेरील व्यस्ततेला जन्म देत होती, आपण खरेच कधीच व्यस्त नव्हतो, आपण तसे फक्त मानत होतो एवढेच. जगरहाटीला चालण्याला आपला काहीच हातभार नाही आणि नव्हता ही जाणिवच माणसाच्या आत्मपरीक्षणाला पुरेशी होती. बडा घर पोकळ वासा अशीच माणसाची अवस्था होती हे आता जाणवत होते. हा संसार एक बुडबुडा आहे, संसार असार आहे ही सगळी जी संत-महंतांनी सांगितलेली तत्वे आपल्या दृष्टीने केवळ वाक्ये होती ती आता पुस्तकातून उतरून आपल्या ह्रदयात शिरली होती. ते शब्द नव्हते तो तर अनुभव होता हे सत्य त्याला उमगू लागले होते. एक मोठा आभासात्मक बुडबुडा फुटुन गेला. आणि तरीही जीवनाचा ओघ अखंड चालूच राहीला हे माणसाला अद्भुत होते. अतोनात फोफावणाऱ्या व्यवहारवादाचा उधळणारा अश्वमेधाचा अहंकारी, नाठाळ घोडा आता नियतिने जेरबंद करून टाकला होता.

स्वयंघोषित सदगुरू आणि तथाकथित गुरू महाराज जेमतेम पाच-दहा हजारांच्या साधकांना आपल्या मार्गावर आणून स्वतः भगवान असल्याचा आव आणणाऱ्या समस्त मंडळींना ७५० कोटी लोकांना ध्यानात आठ महिने गुंतवून ठेवून परमेश्वराने दिग्मूढ करून टाकले होते. कोठेही जाहिराती नव्हत्या, फलक नव्हते, लटकणारी पत्रके नव्हती, मोठी मोठी आश्वासने नव्हती. फक्त होती ती शांतता. निव्वळ व्यवहारवादाबरोबर निखळ अध्यात्मवादही एकाच वेळी जमिनीवर आदळला. ह्यातून आपण सगळे शिकलो तरीही कोरोना सफल झाला.

आणखी एक चांगली गोष्ट कोरोनाने साधली म्हणजे समाज-व्यवस्था जी घराघराला लागलेल्या घरघरीमुळे भंग होत होती त्या व्यवस्थेला बरोबर ठिकाणावर आणली. घरे म्हणजे फक्त दिवसभराच्या कामानंतर येऊन झोपण्याची जागा असेच जणू आपण ठरविले होते. घरासाठी कर्तुत्व पासून कर्तुत्वासाठी घर अशा अवस्थेला मानवता जात होती. प्रत्येक घर हे संपूर्ण मानवी समाज व्यवस्थेचा केंद्रबिंदु अथवा गाभा आहे ही साधी, सोपी समज सुद्धा आपण विसरलो होतो. कोरोनाने परिस्थितिच अशी तयार केली कि लोकांना घरात राहण्याशिवाय दुसरा मार्गच उरला नाही. मग ती हरवलेली साथ आणि नात्यांमधील एकत्र असण्याचा गोडवा सर्वांनाच जाणवू लागला. घरातल्या मंडळींचे गुण अनुभवायला लागले. मुलांची मोठी होण्याची प्रक्रिया आणि त्यातली ती किमया यांची जाणिव प्रथमतःच येऊ लागली. आईच्या किंवा पत्नीच्या हातच्या स्वयंपाकाला केवढी रूची असते तिचा विसर बाहेरचे खाण्याचे वेड लागलेल्या लोकांना पडला होता. बाहेरचे खाणे विकण्यासाठी बनवतात व घरचे खाण्यासाठी हे बऱ्याच लोकांच्या लक्षात उशिरा का होईना आले एकदाचे. कुटुंब संन्यासाची कल्पना मला नेहमीच आवडते. कोणीतरी संसाराचा उबग येऊन त्याचा त्याग करून हिमालयात जाऊन एकटेपणा अनुभवण्यापेक्षा कुटुंबातील प्रत्येकाला अध्यात्माची आवड निर्माण होऊन दर क्षणाचा सत्संग घरात व्हावा हे मला जास्त विलोभनीय वाटते. आणि नेमके हेच कोरोनाने केले. घराघरात जणू काही सिमेंट-विटांच्या गुहांमध्ये सामान्य माणूस असामान्यत्वाचा अनुभव घेत ध्यानात जाता झाला.

मोठमोठे, थकवणारे प्रवास टळले आणि लोक घरा–घरातून कार्यालयीन कामे करू लागले. घरा–घराच्या जागी मग कोठूनही– जिथे जातो तेथे तू माझ्रा सांगाती म्हणत हातात संगणक घेऊन लोक आपली कार्यालयीन कामे करू लागले. सगळ्यांचाच प्रवास वाचला. ज्यांना अशी घरातून काम करायची संधी नव्हती अशा घामातून काम करणाऱ्या चाकरमान्यांवर मात्र कामच गेल्यामुळे प्रवास टाळायची संधी मिळाली. थोडासा राजकीय विरोधकांचा नाममात्र विरोध सोडला तर सामान्य माणसांनी ही परिस्थिती शांतपणे सहन केली. ह्या सगळ्या कोलाहलात आर. के. लक्ष्मणांचा कॉमन मॅन एखाद्या स्थितप्रज्ञासारखा स्थिर राहीला. माणसासाठी कार्यशीलता असे संतांनी कित्येकयुगे सांगून ठेवले होते पण ते निव्वळ शब्द होते सामान्यांसाठी. ते प्रत्यक्ष जीवनात उतरले. लोकांना संतांच्या शब्दांमध्ये सामर्थ्य गवसले.

शैक्षणिक क्षेत्रातही बटट्याबोळाचे छान प्रदर्शन झाले. जगाच्या पाठीवर पहिल्यांदाच जगभरच्या विद्यार्थ्यांनी शाळेची सामूहिक सुट्टी घेतली ती सुद्धा पूर्ण वर्षभरासाठी. तसाही शालेय शिक्षणात राम उरला नाही ह्याची ठाम जाणिव असलेल्या सुज्ञांना मुलांना घरातच शिक्षण दिले जावे अथवा गुरुकुलात पाठवावे असे वाटतच होते. ते वाटणेही प्रत्यक्षात आले. आपापल्या पाल्यांना शाळेत गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले जाते असे दृष्टीआड– सृष्टी आड या न्यायाने मानणारे पालक घरातील मॉनिटरवर दिसणाऱ्या शिक्षकांचे प्रत्यक्ष रूप आणि त्यांचे केविलवाणे प्रयास पाहून मुलाला/मुलीला त्या शाळेत पाठवण्यात आपली केवढी चूक झाली ह्या विचारांनी आपली झोप गमावून बसले. बऱ्याचशा नवरेबुवांना आपली पत्नी स्वयंपाकात एवढी निपुण असल्याचा सुखद साक्षात्कार झाला. डॉक्टर लोकांच्या पाठीवर सुरूवातीचे काही दिवस कोविडचे योद्धे म्हणून कौतुकाच्या थापा पडल्या खऱ्या पण नंतर मात्र सामान्य माणसांच्या अनुभवाला डॉक्टरांचे तेच भयानक रूप पुन्हा प्रकट झाले हेही खरे. कोवीड सुटांमध्ये डॉक्टर एखाद्या अंतराळवीरासारखे भासत होते पण कोवीडच्या अज्ञानामुळे हादरलेली हीच मंडळी नंतर एखाद्या अनोळखी आणि रूक्ष अशा रोबोट सारखे पण दिसू लागली.

थोडक्यात म्हणजे साधारणत: रोगराई कमी झाल्याचा एक आभास झाला खरा कारण कारणाशिवाय होणाऱ्या शस्त्रक्रिया आपसूक थांबल्या. कोरोना शिवाय दुसऱ्या कोठल्याच रोगाने लोक आजारी पडेनात असे झाले. गरमी, पावसाळा, हिंवाळा असे ऋतु बदल होऊनही यावेळी कोणी आजारीच पडले नाहीत असे दिसते. कोरोनाने केवळ माणसांनांच नव्हे तर इतर रोगांनाच मारले असे म्हणावे लागेल. इमर्जन्सी ऑपरेशन ह्या शब्दाची व्याख्या बदलली. डॉक्टरच दयाळूपणाने म्हणू लागले कि ऑपरेशनची गरज नाही. त्यामुळे ऑपरेशनशिवायच बरेच रुग्ण बरे झाले.

भारतिय संस्कृतिने न लढताच इतर संस्कृतिंवर विजय मिळवला. धर्मांतरणाच्या प्रयासाशिवाय व प्रलोभनांशिवाय लोक हिंदू बनले. आधुनिक शेक–हॅंड हग करण्याची जागा पुन्हा एकदा नमस्तेने घेतली. हळद, आले, मोहरी, जीरे, कढीपत्ता यांचा जगातील खप वाढला. आयुर्वेदिक काढे पिऊन लोक एकमेकांचे वेलकम करू लागले. आयुष्यभर अप्रगत अस्पृश्यतेच्या नावाने बोटे मोडणाऱ्या लोकांना अस्पृश्यतमागचे विज्ञान दिसायला लागले.तथाकथित कर्मकंडांनी गांजलेल्या अध्यात्मवाद्यांनी आधुनिकतेचा डंका पिटत धुमाकुळ माजवणाऱ्या चार्वाक पंथियांना चारही मुंड्या चित केले.


आणि आता आपण शांतपणे या वर्षातून सुखरूप बाहेर पडत आहोत. पण मनात अजूनही साशंकता आहेच कि नवे वर्ष काय घेऊन येईल? २०२१ च्या पोटात काय दडले असेल बरे? अजूनही आपण अंधाऱ्या लांबलचक बोगद्यामधून बाहेर पडलेलो नाहीत. परंतु भारतिय संस्कृतिची दिव्य मशाल हाती घेऊन आपण ह्यातून बाहेर पडणार यात काहीच संदेह नाही. कारण आपल्यात ते श्रद्धेचे बीज आहे, आपल्या हातात सदगुरूंचा हात आहे, आपल्या माथ्यावर स्वामींची कृपा आहे. आपले मन शुद्ध आहे. आता एवढेच म्हणायचे,

**“मन शुद्ध तुझे गोष्ट आहे आहे पृथ्वीमोलाची,**

**तू चाल पुढे तुला रे गड्या भीति कशाची,**
**पर्वा भी कुणाची?”**

हे नविन वर्ष तुम्हा सगळ्या साधकांच्या दृष्टीने एक आगळे वेगळे आणि आनंदमय, स्वास्थ्यमय जावो ही सदिच्छा. स्वामींचे आशिर्वाद तुम्हा सर्वांच्या माथ्यावर सदैव राहोत ही स्वामींच्या चरणी प्रार्थना.

**अजित सर**
दि. २७ डिसेंबर २०२०



(भाग ३८वा)

# तेलंग स्वामी

## एक अद्भुत अस्तित्व

**अनुवादक – सौ. शुभदा गर्गे, नाशिक**

ठरल्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी उमाचरणजींना स्वामीजींबरोबर गंगास्नानास जावे लागले. स्वामीजी त्यांच्या पध्दतीने कमीत कमी दोन तास तरी स्नान करीत. कधी प्रवाहाच्या उलट पोहणे, कधी पाण्यावर शवासनात पडून राहणे, तर कधी पाण्यात डुबकी मारून गायब होणे असे प्रकार चालत. ते पाण्यातून बाहेर येईपर्यंत उमाचरणजींना घाटावर पायारीवर बसून वाट पहावी लागे.

त्या दिवशी स्वामीजी स्नान करून येताच उमाचरणजींना रोजच्याप्रमाणे त्यांचे अंग कोरडे पुसून दिले. मग दोघे आश्रमात आले. स्वामीजींनी सांगितले, “आज तुला दिक्षा देईन शांत बसून रहा.”

स्वामीजींनी आधी काही क्रिया सांगितल्या. मग कानात बीजमंत्र सांगितला व त्या मंत्राचा जप करण्यास सांगितले.

काहीवेळाने म्हणाले, “नीट लक्षपूर्वक ऐक, काही महत्वाच्या गोष्टी सांगतो त्यांचे काटेकोर पालन कर. ज्या कामाकरिता जेवढे आवश्यक तेवढेच बोलायचे, उगीच बडबड करायची नाही. त्याने तेज कमी होते. कुठल्याही धर्माचा द्वेष करायचा नाही. ज्याचा ज्या धर्मावर विश्वास असतो त्याला त्या धर्मानुसारच मुक्ती प्राप्त होते. आहाराने धर्म नष्ट होत नाही, फक्त मुक्ती प्राप्त होण्यास विलंब होतो. मुसलमानांना पण मुक्ती मिळते. आर्ततेने जो प्रार्थना करेल त्याला फळ मिळतेच. ज्या घटना बघून तू चकित झालास त्यात नवल करण्यासारखे काहीही नव्हते. मनुष्य जर सच्चा असेल तर तो ही हे सर्व सहज करू शकतो. मनुष्य जीवन फक्त आहार–विहारा पुरते मर्यादित नाही. ज्या शक्ति ईश्वरात आहेत त्या सर्व शक्ती मानवात पण आहेत म्हणून तर मानव ही ईश्वराची सर्वश्रेष्ठ निर्मिती आहे. पण माणुस त्या शक्तींचा उपयोग कसा करायचा हे समजून घेत नाही. ईश्वर कायम आपल्याबरोबरच असतो. पण त्याला जाणून घ्यायची इच्छा कोणालाच होत नाही.”

हे ऐकून उमाचरणजींनी विचारले, “खरेच ईश्वराचे दर्शन होऊ शकते?” स्वामीजी उतरले, “साधना केल्यास गुरुकृपेने दर्शन होऊ शकते. तुला दर्शन घ्यायचे आहे का?”

उमाचरण म्हणाले, “हे प्रभो, मी धन्य आहे. माझे सौभाग्य आहे की प्रत्यक्ष देवच मला गुरुच्या रुपात लाभला आहे. परमेश्वराशिवाय ईश्वराचे दर्शन कसे होईल?

स्वामीजी म्हणाले, “आत्ता जा. सूर्यास्तानंतर ये.” त्यांची आज्ञेनुसार उमाचरणजी त्याचदिवशी संध्याकाळी परत आश्रमात आले. थोडया वेळाने स्वामीजींनी सांगितले, “शेजारच्या खोलीत कालीमातेची मूर्ती आहे जा. दर्शन घेऊन ये.”

त्यानुसार उमाचरणजी बाजूच्या खोलीत जाऊन कालीमातेच्या दगडी मूर्तीचे दर्शन घेऊन आले. स्बामीजींनी विचारले, “कालीमातेला येथे बघायचे आहे का?”

उमाचरणजी नम्रतेने म्हणाले, “गुरुजी माझे एवढे भाग्य आहे का? आईला पाहणे व जगन्मातेला पाहणे सारखेच आहे. माझ्यासारख्या पामरावर आपण कृपा केलीत तर माझे जीवन कृतार्थ होईल.”

उमाचरणजींना शांत बसायला सांगून स्वामीजी ध्यानस्थ झाले. जवळ जवळ तासभर ते ध्यानात होते. त्यांचे ध्यान भंग होताच उमाचरणजींना स्पष्ट दिसले की...

दगडी कालीमातेची मूर्ती एखाद्या बालिकेसारखी हळु–हळु चालत चालत त्यांच्यासमोर येऊन उभी राहीली. दिव्याच्या उजेडात चैतन्यमयी, सर्वमंगल अशी विश्वरूपिणी जगन्माता प्रत्यक्ष उभी होती. उमाचरण स्तब्ध होऊन बघतच राहीले.

स्वामीजी हासून म्हणाले, “आत जाऊन बघून ये मूर्ती जिथे होती तिथे आहे की नाही !”

उमाचरणजी घाबरून आत गेले तर मूर्ती तेथे नव्हती. अधिकच बावरून ते चटकन बाहेर आले. आत ते मूर्ती निरखू लागले. यावेळी देवीची जीभ बाहेर नव्हती व तिच्या पायाखाली महादेव नवहते. स्वामीजींच्या आज्ञेनुसार त्यांनी मातेच्या पायाला हात लावून नमस्कार केला. तो स्पर्श त्यांना मानवीच वाटला. काही वेळाने स्वामीजींनी देवीमातेला आत जाण्याचा आदेश दिला. माता हळुहळु आत निघून गेली.”

क्रमश:



# रेकि – कृष्ण आणि साधक

मीना भावे, वडोदरा.

रेकि सेमिनार मध्ये नेहमीच काही मौलीक वाक्ये कानावर पडत असतात. सेमिनार संपला तरी ती वाक्ये मनात रेंगाळतात. नकळत त्यावर मनन / चिंतन घडते आणि सेमिनार मध्ये रुजलेल्या रेकि बीजाला नविन धुमारे फुटतात.

या महिन्यात सेमिनार मध्ये एक वाक्य कानी पडले – रेकि तुमच्या आयुष्यात कृष्ण बनून आली आहे. सेमिनार संपला तरी कितीतरी दिवस हे वाक्य मनात पिंगा घालत होते.

कृष्ण, भगवान कृष्ण. अनेकविध रुपे आहेत त्यांची. सर्वच लोभस. प्रत्येकाला आयुष्याच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर वेगवेगळ्या रुपात ते भेटातात किंवा त्यांचे ते रूप भावते. सर्वांशीच त्यांचे खास असे नाते असते जे जन्मभर आपली पाठराखण करते.

रेकि तर जन्मापासून आपल्या सोबत आहे. अगदी आपल्या श्वासांसारखी. जिथे प्रेम आणि करूणा आहे, चैतन्य आहे तेथे रेकि आहेच. तो चैतन्याचा प्रवाह, जीवनाचा आधार म्हणजेच रेकि. मात्र रेकि साधनेत येण्याआधी तिच्या अस्तित्वाची आपणास जाणीवही नव्हती.

भगवान कृष्णाच्या चरित्रात एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते की श्रृती–स्मृती किंवा परंपरा पालन यापेक्षा प्राप्त परिस्थितीत सद्सद्विवेक बुध्दीला स्मरून त्यांनी आयुष्यात सर्व निर्णय घेतले.

आपल्या सर्वांना पण हीच शिकवण दिली जाते की उत्तम जीवनमुल्यांची कास धरून सद्सदविवेक बुध्दीने वागणे हीच सुखी समाधानी आयुष्याची गुरुकिल्ली आहे. मला वाटते की भगवान कृष्ण सद्सदविवेक बुध्दीच्या रुपात सदैव आपल्या बरोबर असतात आणि रेकि तत्वांचे पालन हे तर उत्तम जीवनमुल्यांचा एक वस्तुपाठच नाही का?

अशा प्रकारे लौकिक अर्थाने सुखी–समाधानी आयुष्य जगत असताना काही लोकांना जीवनात काहीतरी कमतरता जाणवू लागते. आहे मनोहर तरी गमतें उदास अशा काहीशा अवस्थेत कोणत्याही वस्त / व्यक्तींवर सुखासाठी अवलंबून रहाणं (वस्तुनिष्ठ आनंद), त्यातून मिळणारे तात्पुरते सुख यातील मर्यादा जाणवू लागतात. संत महात्म्यांची चरित्रे वाचताना, सत्पुरूषांचे, परिचित साधकांचे जीवन जवळून बघताना सुखाची, आनंदाची व्याख्या तपासून पहाविशी वाटते. काही जणांना आकस्मिक एखाद्या भयानक परिस्थितीचा सामना करावा लागतो आणि त्यांचा जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलून जातो. (जर ते स्मशान वैराग्य असेल तर आयुष्य पुर्ववत सुरु होते).

या काळात परिचितांकडून वेगवेगळे सल्ले दिले जातात. त्यानुसार विविध साधना मार्ग चोखाळले जातात जसे नामजप, पोथी वाचन, सत्संग, ग्रंथाभ्यास. काही भाग्यवानांच्या आयुष्यात रेकि येते तर काहींना गीतामृताचा लाभ होतो. अर्थात कोणत्याही साधनेचे ध्येय असते आपण जेथून आलो तेथे परत जाण्याचा

मार्ग दाखवणे, किंबहुना नरदेहाचे तेच प्रयोजन आहे. नर म्हणजे नारायण होण्याची पात्रता असणारा मनुष्य.

हळुहळु आपल्या प्रकृतीनुसार कोणती साधना आपल्यासाठी योग्य आहे ते कळत जाते आणि वानर ते नर हा प्रवास सुरु होतो (पशुत्वाकडून मनुष्यत्वाकडे). आपण सर्वांनी रेकिच साधना म्हणून स्विकारली आहे. सुरुवातीच्या काळात जशी जमेल तशी घेतल्या जाणाऱ्या रेकिचे अनुभव येऊ लागले, साधकांचे अनुभव ऐकले की तीचे महत्व कळू लागते, साधनेची गोडी लागते. रेकि साधनेसाठी दिला जाणारा वेळ ही उत्तम गुंतवणूक आहे हे कळले की रेकि जीवनाचा भाग बनते. जशी रेकि साधना वाढत जाते तशी स्वत:त होणारे सूक्ष्म बदल जाणवू लागतात. लौकिक जीवनात तर्कनिष्ठ (rational) निर्णय घेता घेता प्रेमभाव जागृत होतो अन मुरलीधर कृष्ण सख्यभावाने सोबत करू लागतो. जीवनाकडे सजगपणे बघण्याची दृष्टी लाभते. राग–लोभ, अंहकार यातील फोलपणा जाणवू लागतो. "हे मी काय करते आहे" हा मंत्र सतत सावध करू लागतो.

मला वाटते की आपले गुरु नियतीच्या रुपात साक्षीभावाने सतत आपल्या बरोबर असताताच आणि साधना एका विशिष्ट टप्प्यावर पोहोचली की अशी परिस्थिति निर्माण करतात की आपल्याला अंतरी गुरुंची ओळख पटते आणि गुरु आपले स्वरूप प्रकट करतात. गुरुंच्या मार्गदर्शनाखाली साधना करता करता जीवनात अमुलाग्र बदल घडु लागतात. जाणीवांचे क्षेत्र विस्तारते. हळूहळू आपण काहीच करत नाही तर आपल्या हातून सर्व घडत जाते ही जाणीव स्थिरावते. "निमित्तमात्रं भव सव्यसाचिन् (श्रीमद्भगवदगीता ११.३३)" याचा नेमका अर्थ ध्यानात येतो. Healing साठी आपण निमित्त आहोत या भावनेने कृतज्ञता, धन्यता वाटते.

कधी कधी पुर्व संस्कारांच्या रुपात काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर आणि अंहकार असे षड्रिपू डोके वर काढतात. साधनेशी प्रामाणिक राहीलो, गुरुंवर अढळ श्रध्दा ठेऊन त्याच्याशी जोडलेले राहीलो तर गुरुच या परिस्थितीत मार्ग दाखवतात.

पण दुर्दैवाने गुरुंचा हात सुटला तर सद्सदविवेकबुध्दी वर पडदा पडतो आणि सर्वस्वाचा नाश होतो. आठवा, पांडवांच्या आयुष्यातील द्यूतक्रीडेचा प्रसंग. मात्र आपली चूक कळली आणि अन्यनभावाने गुरुंना शरण गेलो तर गुरुमाऊली अशक्य ते शक्य करतात. काहीवेळा आपली साधना बळकट करण्यासाठी गुरुच परिस्थिती निर्माण करतात. जसे पांडवांच्या आयुष्यातील बारा वर्षे वनवासाचा प्रसंग. राजवाडयात राहून सर्व प्रकारचे ऐश्वर्य भोगणाऱ्या पांडवांकडून १२ वर्षे वनवासाचे तपच करून घेण्यात आले. पांडवांचा अहंकार समूळ नष्ट व्हावा आणि निर्णायक धर्मयुध्दासाठी आवश्यक तयारी योग्यरितीने व्हावी, दैवी अस्त्र शस्त्रांनी अर्जुन सज्ज व्हावा हाच त्या मागचा भगवान कृष्णांचा हेतू असावा. अर्जुनाच्या आयुष्यात तर उर्वशीच्या रुपाने मोहाचा, तपोभंगाचा प्रसंग पण आला पण कृष्णसखा सोबतीला असल्याने त्यातून सुटका झाली. वनवासानंतर येणारा एक वर्षाचा अज्ञातवास म्हणजे स्वत्वाचा, मी कोण आहे याचा संपूर्ण विसर. या काळात सर्वश्रेष्ठ धनुर्धराला बृहंनडा बनून रहावे लागले. अशारीतीने शुन्य झालो तरच पूर्ण होण्याच्या अंतीम टप्प्यात पोहचता येते. शुन्य होणं म्हणजे आत्म्याशी जोडले जाणं.

**विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म**

**भेदाभेद भ्रम अमंगळ...**

हा अनुभव घेणं.

सर्व चराचर एकाच स्पंदनाने, एकाच नादाने भरलेले आहे. मी–तू असे वेगळेपण नाहीच. सर्व भगवंताचीच रुपे. येथे जीवनाचे सर्व संदर्भ बदलतात. गुरुंच्या कृपेने नविन दृष्टी प्राप्त होते अर्जुनाप्रमाणे विश्वरुपदर्शन घडते.

विश्वरुपदर्शन घडवल्यावर भगवान कृष्ण अर्जुनाला सांगतात यथेच्छसि तथा करू (श्रीमद्भगवदगीता १८.६३), तुला योग्य वाटेल ते कर. या टप्प्यावर वेगवेगळ्या सिध्दींच्या मोहजालात अडकण्याची पूर्ण शकत्या असते. जे यात अडकतात, ज्यांचा तोल जातो त्यांच्यासाठी सर्वच संपते, घूळीला मिळते. जे नर हा टप्पा पार करतात ते नारायण होतात आणि समजते की

**कृष्ण ही साधना आहे आणि साध्य ही.**

**रेकि ही साधना आहे आणि साध्य ही.**

**गुरुच कृष्ण आहेत आणि रेकि सुध्दा.**

**नष्ट मोहः स्मृतिर्लब्धा त्वत्प्रसादान्मयाच्युत**

(श्रीमद्भगवदगीता १८.७३)

यानंतर गुरु शेवटची लीला करतात आणि त्यांच्या एका कटाक्षाने "आत्मदिपो भव् – Lamp unto yourself and then light will happen··· हा साक्षात्कार एका क्षणात होतो.

**अवघा रंग एक झाला । रंगी रंगला श्रीरंग ॥**

हीच ती स्थिती आणि....

आणि मग गुरुचरणी अढळपद प्राप्त होते.

**शुभम् भवतु !!!**



# युसुफ आणि उंदीर

एका गावाच्या बाहेर दूर एका जंगलात एक मन्सूर नावाचा सिद्ध पुरूष रहात होता. मन्सूर एक महायोगी म्हणून प्रसिद्ध होता. त्याच्या आश्रमात नेहमीच साधकांची गर्दी असायची. असाच एक युसुफ नावाचा युवक अध्यात्म्याच्या ओढीने मन्सूरच्या आश्रमात आला. मन्सूरने त्याच्याकडे पाहीलेच नाही. थोडेसे दुर्लक्षच केले. युसुफ तेथेच राहीला. दररोज आश्रमात सेवा करायची, खायचे प्यायचे एवढेच. गुरू मन्सूर काही केल्या त्याची दखल घेईनात.

असे साधारण चार महिने गेले. युसुफचा निर्धार मात्र पक्का होता, त्याला मन्सूर गुरूंचा शिष्य बनायचेच होते, चार महिने झाल्यानंतर एक दिवस सकाळीच गुरूंनी त्याला हटकले आणि विचारले, “का बाबा तू येथे आला आहेस?” युसुफने आनंदाने सांगितले, “गुरूजी, मला तुमचे शिष्यत्व पत्करायचे आहे. मला तुमच्याकडून साधनेची दीक्षा घ्यायची आहे.” गुरूजींनी मान डोलावली व आपल्या एका शिष्याला बोलावून सांगितले, “ते बघ तिथे एक छोटीसी लाकडी पेटी (बॉक्स) मी ठेवली आहे. ती जशीच्या तशी ह्याला दे”. तो डबा युसुफची हातात दिल्यावर गुरूजी म्हणाले, “हे बघ मुला, ह्या आश्रमापासून दूर जंगलामध्ये एक साधू राहतो. ही पेटी अशीच्या अशी त्याच्यापर्यंत पोहोचवायची. तुला बरेच श्रम पडतील. दाट जंगलातून चालावे लागेल. मध्ये एखादी नदीही पार करावी लागेल. परंतु ही पेटी फार महत्वाची आहे आणि त्या साधूपर्यंत पोहोचवणे आवश्यक आहे. ही महत्वाची जबाबदारी आहे. हे एवढे काम करून परत आल्यावर मी तुला दीक्षा देईन. परंतु काम जोखमीचे आहे एवढे लक्षात ठेव. आता निघ. शुभास्ते पंथान:”

युसुफ ती पेटी घेऊन मोठया आनंदाने निघाला. त्याला आपल्याला दीक्षा मिळणार ह्या गोष्टीचा अतीव आनंद झाला होता. ज्या गोष्टीची गेली काही वर्षे वाट पाहत होता ती आता घडणार होती, उत्साहाने सळसळलेला युसुफ मग सांगितलेल्या वाटेने निघाला. हातातली छोटी पेटी संभाळत तो एकामागून एक असे पाडाव पार करत होता. टळटळीत दुपार आणि वरून बरसणारे ऊन यामुळे तो थोडा दमला व त्याला भूकही सडकून लागली. आश्रमातून आणलेल्या शिदोरीवर ताव मारून थोडा आराम करावा या उद्देशाने तो एका झाडाखाली विसावला. आतापर्यंत त्या पेटीला त्याने तसे आपल्यापासून दूर केलेच नव्हते. पण आता मात्र त्याने ती पेटी आपल्याला दिसेल अशा बेताने बाजूला ठेवली आणि एका दगडाची उशी करून तो आराम करू लागला. पण त्या पेटीमुळे त्याला झोप येईना. त्या पेटीकडे पहाता पहाता त्याच्या डोक्यात विचारांनी थैमान घातले. काय असेल ह्या पेटीत. तशी पेटी खूपच हलकी लागत होती, परंतु त्यात काहीतरी खास असावे नाहीतर एवढी जबाबदारी आपल्यावर गुरूंनी दिली नसती. पण एक मन म्हणत


होते कि कशाला विचार करायचा आपण? गुरूजींनी जबाबदारी दिली ती आपण नेटकेपणाने निभावयाची. दुसरे मन म्हणत होते पाह्यला काय हरकत आहे उघडून त्या पेटीत काय आहे ते? तसेही काही फार महत्वाचे नसावे कारण त्या पेटीला कुलुप वगैरे काहीच नाही लावलेले. बरे पेटी फारच हलकी आहे जणू काही तिच्यात काहीच नाही. आणि परत बंद करून ठेवली कि कोणाला काही कळायचे नाही. आणि आपण थोडेच त्यात जे काही असेल ते घेणार आहोत? हे द्वंद्व बराच वेळ चालले. शेवटी दुसरे मन जिंकले. त्याच झाडाखाली बसून त्याने ती पेटी हळुवारपणे उघडली. गंमत म्हणजे त्यातून चक्क एक पिटुकला उंदिर बाहेर पडला आणि आजूबाजूच्या रानात पळून गेला. युसुफ दचकला आणि आता खूप घाबरलाही. त्याच्या आता लक्षात आले कि त्यात एक उंदिर होता आणि तो आता कोठून आणायचा? पेटी रिकामीच द्यावी लागणार त्या साधूला. आणि त्याला जर माहित असेल कि त्यात उंदिर होता तर मग त्याला हेही कळेल कि मी ती पेटी उघडली आहे. तोही रागावेल आणि माझे गुरू मसूरही रागावतील. पण आता काय करू शकतो आपण?

उदास मनाने तो शेवटी त्या साधूकडे पोहोचला व विनम्रतेने त्याने ती पेटी त्या साधूला आपल्या गुरूच्या निरोपासहित दिली, साधूने पेटी उघडली व ती रिकामी पाहून तो हसला व म्हणाला, "आता काही तुला तुझे गुरूजी दिक्षा देतील असे मला वाटत नाही. ही पेटी पुन्हा नेऊन दे त्यांना." तसाच उदासपणे युसुफ पुन्हा आपल्या गुरूंच्या आश्रमात आला व त्याने ती पेटी मन्सूर गुरुजींच्या हाती दिली. त्यांनाही एव्हाना लक्षात आले होते कि काय गडबड झाली. त्यांनी युसुफच्या खांद्यावर हात ठेवला व ते म्हणाले, "बेटा, साधनेच्या मार्गात पहिली महत्वाची गोष्ट म्हणजे आपल्या मनाला आवरणे. तुला आपल्या मनाला नाही सावरता आले. एका क्षुल्लक उत्सुकतेपोटी तू आपले अवधान गमावून बसलास. हे अवधान सातत्याने राखता यायला हवे हे नेहमी ध्यानात ठेव. पहिल्या आपल्या मनाला शिस्त लाव आणि मगच परत दिक्षेला ये. आता मी तुला दिक्षा देऊ शकत नाही.

त्यानंतर मनाला शिस्तीचे वळण लावून आणखी चार वर्षांनी युसुफ आपल्या गुरूंकडे आला आणि त्याने गुरूंकडून दिक्षा मिळवली.







# स्वामी

स्वामी वसले ज्या अंतरी, भय कसले त्या भितरी ।
एक हाक फक्त तयां देता, ओ ऽ मिळे कोसांवरूनही ॥

मनुष्य प्राणी हा अजाण, किर्ती सातसमुद्रापार ।
दर्शन तुमचे ज्यांसी घडले, पारणे फिटले अंतःपार ॥

ओघळा वाहे जयांचे नेत्री, काळ भेटवी तुमचे क्षेत्री ।
तुमची लीला ही अगाध, अश्रु परिवर्तले सुखापार ॥

जल नसता त्या आडीं, पाझर फुटले दगडांतूनी ।
कैसे घडले कुणा न कळले, पाणी आले ते कोठूनी ॥

गो जाहली दुःखी कष्टी, क्षीर वाहे ना उदरातूनी ।
कर ठेवूनी आंजारूनी, क्षीर वाहले पाते भरूनी ॥

आला पैसा माज ज्यासी, शिकवण दिली त्या प्राण्यासी ।
पाय धरवूनी तुमचे त्यासी, भूल घेतली स्वउदरासी ॥

मायबाप तू त्या दिनाचा, ज्यांचे नाही कुणी या जगती ।
दुःख तयांचे पुसूनी तुम्ही, करसी चिंतातूर त्यासी ॥

वांझ आली तुमचे दारी, श्रीफळ देऊनी त्या पदरासी ।
संतती दिलीस त्या वांझोटी, आशिर्वाद दिला बालासि ॥

दर्द काही का असेना, बोलणेची गरजच नाही ।
स्वतः ओळखूनी तयाचे अंतरी, उत्तर तयार तुमच्या औष्ठी ॥

दुःख जाहले जर्जर फार, सोसवेना भूत भविस ।
भिऊ नको अजाण बाळा, आहे मी तुझ्या पाठीस ॥

शब्द पडताक्षणीच कानी, पाझर फुटला अंतःकरणी ।
विसरलो दुःख मी माझे, झालो दंग नामस्मरणी ॥

नाम घेता तुमचे ओठी, गेलो विसरून मी मजसी ।
तल्लीन झाला भक्त तुमचा, वाटून गेला तव चरणासी ॥

लेखा शेट्ये



(लेखांक १६)

# जाहल्या स्वामीराज वैद्य, व्याधी पळे आपणची...

एक वैष्णव ब्राह्मण वृद्ध असून पोटशूळाने अति व्याधिग्रस्त होता. त्याने बरेच दिवस महाराजांची सेवा केली. दीडशे ते दोनशे सेवेकरी समर्थांबरोबर असत. इतक्यांनी सेवा ती काय करायवयाची? तर त्रिकाल दर्शन, तीर्थ प्रसाद व त्यांच्याजवळ जाऊन बसणे हीच काय ती सेवा! थोड्या सेवेकऱ्यांना सेवा करावयास मिळे, म्हणजे छाटया धुणे, पलंग झाडणे, स्वयंपाक करणे, फुले आणणे, दिवा बत्ती वगैरे लावणे, महाराज कोठे जावयास निघाले कि त्यांच्या सामानाचे ओझे वाहणे असो. पोटशूळ्या ब्राह्मण व्यथेने अति व्यापला. एकदा साखर विहीरीवर महाराज बसले असता जवळ एक लिंबाचे झाड आहे. त्याच्याखाली ब्राह्मण बसून प्रार्थना करीत आहे, तो त्याचकडे पाहून समर्थ म्हणाले, "का रे, तुझ्या बापाचे आम्ही काय लागत आहोत, उगीच आम्हा संन्याशांकडे येऊन का भरतोस?" असे बोलून उगीच राहिले. ब्राह्मण म्हणाला, "महाराज, आपल्याशिवाय कोण त्राता आहे? अनाथावर कृपा करावी." असे म्हणून ओरडू लागला. ते ऐकून दीनदयाळ कळवळले, आणि म्हणाले, "जा, हत्तीच्या लेंडया आणि तुझ्या डोकीवरील लिंबाचा पाला एकत्र करून खा. म्हणजे तुझा पोटशूळ जाईल."

हे श्रींचे वाक्य शिरसावंद्य करून लगेच जाऊन त्या दोन जिनसा एकत्र करून त्या ब्राह्मणाने खाल्ल्या. दुसऱ्या दिवशी समर्थ तेथेच होते. पुन्हा तो ब्राह्मण महाराजांची प्रार्थना करू लागला कि, महाराज, लिंबाचा पाला कडू लागतो. ते ऐकून भक्तकामकल्पद्रूम त्यास रागावून म्हणाले, "अरे, ह्या फांदीचा पाला खा. म्हणजे गोड लागेल." अहाहा! काय चमत्कार! त्या झाडास तीन फांद्या असून दोन फांद्या कडव्या व एक ज्या फांदीस श्री समर्थांनी हात लावला ती फांदी गोड. काय सामर्थ्य हे! ते झाड अद्याप आहे. पुष्कळ लोक त्या फांदीच्या पाल्याचा प्रसाद म्हणून पाला काढून नेतात. हे अनुभवाने कोणी अक्कलकोटात जाऊन आले असतील त्या सर्वत्रांस माहित असेल. पोटशूळ्या ब्राह्मणाचा ह्या औषधाने थोडयाच दिवसात पोटशूळ गेला. .

(संदर्भ: अनंतकोटी ब्रह्मांडनायक राजाधिराज अक्कलकोटनिवासी श्री स्वामी समर्थ यांचे चरित्र व आठवणी– प्रकाशक श्री न.न झुरळे– पृष्ठ ४४–४५)

# स्वामी विवेकानंद आणि ध्यान




**लेखांक १०वा**

**अनुवादक : श्री प्रांजल जोशी, पुणे**

**प्रश्न : वेदांताचे ज्ञान कसे प्राप्त करायचे?**

**स्वामी विवेकानंद :** श्रवणाने, परिक्षणाने आणि ध्यानाने सद्गुरुंकडून जे ज्ञान मिळते त्याच्या श्रवणाने. एखादा जर शिष्य नसेल पण तरीही साधक या नात्याने सद्गुरुंचा उपदेश श्रवण करून तो मोक्षपदाला जाऊ शकतो.

**प्रश्न : ध्यान कोठे करावे – शरीराच्या अंर्तगत की बाह्य? मनाला कोणत्या दिशेने वळवावे आतल्या की बाहेरच्या?**

**स्वामी विवेकानंद :** आपले ध्यान नेहमी अंर्तगत असावे. मनाचा विचार करता त्या मानसिक पातळीवर पोहचायला खुप वेळ लागेल. आता आपला संघर्ष फक्त शारिरीक पातळीवरचाच आहे. जेव्हा आपण शारिरीक आसनांची स्थिरता प्राप्त करतो, त्याच आणि केवळ त्याच वेळेला मनाच्या संघर्षाची सुरुवात होते. आसनांवर एकदा जय मिळवला की आपली इंद्रिय स्थीर होतात आणि आपण जेवढा वेळ बसू इच्छीतो तेवढया वेळ स्थीर बसू शकतो.

**प्रश्न : काही वेळेला सतत जप करून आपल्याला थकवा येतो. तेव्हा तो जप चालू ठेवावा की त्याबदली एखादे छानसे पुस्तक वाचावे?**

**स्वामी विवेकानंद :** जपामुळे थकवा येण्याची दोन कारणे असू शकतात. काही वेळेला आपल्या मेंदूला श्रम पडल्याने तो थकतो आणि काही वेळेला आपल्यातील आळसाचा तो परिणाम असतो. जर पहीले कारण असेल तर काही कारणासाठी जप थांबवावा कारण त्यानंतरही जप चालू ठेवला तर मन संभ्रमित किंवा विक्षिप्त होऊ शकते. परंतु जर कारण वरीलपैकी दुसरे असेल तर मनाला जबरदस्तीने जप करण्यास भाग पाडावे.

**प्रश्न : मन जर भरकटत असेल तर जप साधना बराच काळ चालू ठेवावी का?**

**स्वामी विवेकानंद :** हो. जसे काही लोक आपल्या नाठाळ घोड्याला ताळ्यावर ठेवण्यासाठी त्याच्या पाठीवर खोगीर कायमचे ठेवतात.

**प्रश्न : प्रार्थनेचा सुपरिणाम कोणता?**

**स्वामी विवेकानंद :** प्रार्थनेने आपल्या आंतरिक सुप्त शक्ती सहजपणे जागृत होतात आणि हे जर जाणिवपूर्वक करता आले तर आपल्या सर्वच मनोकामना पूर्ण होतात, परंतु हे जर अजाणता झाले तर कदाचित दहातील एखादी इच्छा पूरी होते.

**प्रश्न : तुम्ही भक्तीयोग ग्रंथामध्ये असे म्हटले आहे की दुबळ्या शरिराच्या व्यक्तीने योग साधना केल्यास त्याच्या तीव्र प्रतिक्रिया उमटतात अशा वेळेस काय करावे?**

**स्वामी विवेकानंद :** स्वात्मज्ञान प्राप्त करताना जर मृत्यू आला तर काय करणार ! शिकण्याच्या प्रयत्नामध्ये माणसाला मरण्याचे भय नसते आणि धर्मासाठी मरण्यामध्ये कसले भय?



# अष्टावक्र गीता

(भाग ४)

अजित सर

## अध्याय पहिला – (सूत्र ४)

**यदि देहं पृथक्कृत्य चित्ति विश्राम्य तिष्ठसि ।**
**अधुनैव सुखी शान्तः बन्धमुक्तो भविष्यसि ॥**

**अर्थः** तू जर देहाला आपल्यापासून अलग करून आपल्या चैतन्यामध्ये विश्राम करून स्थिर होशील तर आताच तू शांत, सुखी आणि बंधमुक्त होशील.

अष्टावक्र म्हणतात कि वैराग्य आल्याने तू मुक्तीसाठी पात्र होशील. त्यानंतर गुरूंकडून उपदेश मिळाला कि आत्मज्ञानाचा मार्ग मोकळा झाला. परंतु मुक्तीसाठी केवळ आत्मज्ञान असून उपयोग नाही. मी शुद्ध आत्मा आहे, मी साक्षी आहे, मी म्हणजे हे शरीर नाही इत्यादि मुक्तीसाठी पुरेसे नाही. हे सगळे ज्ञान असूनसुद्धा जर तू शरीराशी जोडून राहीलास तर तू मृत्युनंतर पुनर्जन्माला सामोरा जाशील. म्हणून त्याला मुक्ती म्हणता येणार नाही. सविकल्प समाधिमध्येसुद्धा जेथे सगळ्या संस्कारांची बीजे घट्टपणे रूजलेली असतात तेथेही ह्याच ज्ञानाचा साक्षात्कार होतो. योग्य वातावरणात मात्र पुन्हा ह्या बीजांना अंकुर फुटतात आणि पाहता, पाहता त्या बीजांचा महावृक्ष बनतो. त्या बीजांनासुद्धा नष्ट केल्यानेच एखादा निर्विकल्प समाधिचा अनुभव करू शकतो. तीच मुक्तावस्था.

अष्टावक्र येथे जनकाला समजावत आहेत कि केवळ चैतन्यामध्ये विश्रामच नव्हे तर तेथे स्थिरावणे हे ही आवश्यक आहे. समाधिची ही अवस्था प्राप्त करायला योगशास्त्र सात आवरणांची गोष्ट करते. योग त्यासाठी सप्तपदीची प्रक्रिया शिकवते. परंतु अष्टावक्रांचा मार्गच वेगळा आहे. त्यांचा ह्या विषयाकडे पाह्यचा दृष्टिकोनच वेगळा आहे. ते म्हणतात कि निर्विकल्प समाधीची अवस्था एका क्षणात प्राप्त होते ज्या क्षणी साधक आपल्या देहापासून अलग होऊन आपल्या चैतन्यामध्ये स्थिर होऊन विश्रांत होतो. त्यासाठी मग कोणत्याही प्रक्रियेची गरज नाही. कारण सगळ्याच प्रक्रिया आभास आहेत. आभासाचे निराकरण फक्त आत्मबोधानेच होते त्यासाठी कोठलीच प्रक्रिया कामाला येत नाही. आत्म्याबरोबर अहं जुडलेला आहे, अहं हे आत्म्याचेच प्रतिबिंब आहे. आत्मा जीवनाचा खेळ खेळू शकत नाही कारण त्याला द्वैत नाही. तो निर्गुण आहे, निराकार आहे, निर्विकार आहे. मग जीवनाचा खेळ खेळायला त्याला अहंची गरज पडते. अहंकारातून वासनांचा जन्म होतो आणि वासनापूर्तिसाठी शरीराची गरज भासते. वासनाच नसतील तर शरीराची आवश्यकताच नाही. योगाचे केंद्र शरीर आहे. जर तू ह्या शरीरापासून अलग होऊन आत्मभावात स्थिर होशील तर तू ह्या क्षणीच मुक्त, शांत व सुखी होशील. मग त्यासाठी कोठलाही अडथळा येणार नाही. त्यासाठी कोणत्याही साधनेची गरज नाही. आपण एखाद्या दोरीला साप समजून घाबरतो, पण ज्या क्षणी आपण प्रत्यक्षात पाहतो कि तो साप नसून एक साधी दोरी आहे त्याक्षणी मग कोठल्याच कर्मकांडाची, क्रिया–कर्मांची गरज राहत नाही तसेच काहीसे. एका आत्मबोधाने मुक्ती साध्य होते.

आपण सर्वच मुळात पूर्ण असतो. परंतु स्वत:ला अपूर्ण समजून जगत असतो. पूर्णत्वाच्या प्राप्तिसाठी आपण मग आयुष्यभर धडपड करतो. नाना प्रकारच्या साधना करतो. परंतु केवळ एका क्षणाची एक समज आपल्यातील विक्षेप दूर करतो व आपल्याला आपल्या पूर्णत्वाचा साक्षात्कार होतो. कारण ते पूर्णत्व आपल्या अस्तित्वातच असते. ते बाहेरून आणावे लागत नाही. सगळ्या प्रक्रिया बाह्य आहेत. आत्म्याला कर्मच नाहीत, आसक्ती नाही म्हणून संस्कार नाही. आपल्या दिव्य अस्तित्वात आपण स्थिरावलो कि कर्माच्या बदली आपल्या लीला सुरू होतात. लीलांना संस्कार नसतात.

## अध्याय पहिला – (सूत्र ५)

**न त्वं विप्रदिको वर्णो नाश्रमी नाक्षगोचर ।**
**असंगोऽसि निराकारो विश्वसाक्षी सुखी भव ॥**

**अर्थ:** तू ब्राह्मण वगैरे कोठल्याच वर्णाचा नाहीस, ना तू कोठल्याही आश्रमाचा वासी आहेस. तू डोळे वगैरे इंद्रियांचा विषय नाहीस. तू निराकार आहेस, तू विश्वसाक्षी आहेस हे जाणून तू सुखी हो.

येथे अष्टावक्र जनकाला समजावत आहेत कि तू जर आत्मस्थित आहेस, आत्मस्वरूप आहेस तर तुला कोठला वर्ण? तू ब्राह्मण नाहीस, क्षत्रिय नाहीस, वैश्य नाहीस आणि क्षुद्रही नाहीस. आत्म्याला धर्म नसतो, जात नसते, त्याला कोठल्या आश्रम अवस्थेत बांधता येत नाही. हे सगळे भेदभाव अहंने तयार केले आहेत. त्यात आत्म्याचा काहीच संबंध नाही. केवळ एक जाणिव कि तू आत्मा आहेस तूला संसाराच्या पाशापासून मुक्त करेल. हे सगळे अज्ञान आहे, त्यातून तू मुक्त हो. मग तुला कोठल्याही प्रक्रियांची गरज नाही. सगळ्या जगाने असे ठाम ठरवून टाकले आहे कि आयुष्य कठीण आहे, साधना कठीण आहे आणि मग प्रक्रिया हा एकच मार्ग बहुतेकांनी चोखाळला. अष्टावक्र म्हणतात कि आपल्याला काही कमवायचे नाही आहे. आपल्याला फक्त जे हरवले आहे ते गवसायचे आहे. आपला आत्मा शोधण्यासारखी वस्तू नव्हे, ना त्याचे अस्तित्व कोठे अस्तित्वाच्या बाहेर आहे कि जे शोधल्याने मिळेल. सर्व बाह्य गोष्टी ज्या अहं, मन, बुद्धी आणि शरीर ह्यांनी रचल्या आहेत त्यांच्यापासून दूर राहून आपल्याला पुन्हा आपल्या आत्मस्थानात राह्यचे आहे.

हे वाचताना मला एका गोष्टीची आठवण होत आहे. हिमालयाच्या एका पर्वताच्या कुशीत एका झोपडीत एक साधू राहत होता. एके सकाळी एक श्रीमंत गृहस्थ त्याचा शोध करत त्याच्याकडे आला व म्हणाला, मला शांति हवी आहे, म्हणून मला तुमच्याबरोबर राह्यचे आहे. साधू म्हणाला, तू एवढा श्रीमंत आहेस, एवढा यशस्वी आहेस, तुझ्याकडे मालमत्ता, मोटार गाडया एवढे सगळे असूनही शांति नाही? येथे कोठे मिळणार तुला शांति? तो गृहस्थ आपली जिद्द काही सोडेना, शेवटी कंटाळून साधूने त्याला म्हटले, राहा बाबा येथेच. मला काही त्रास नाही. दिवसभर साधू आपल्या साधनेत मग्न होता व ती व्यक्ती फक्त त्यांच्याकडे पाहत होती. संध्याकाळी झोपडीत अंधार झाला. बाहेर चांदणी रात्र होती. साधू बाहेर जाऊन काहीतरी शोधत होता. त्याच्यामागे हा गृहस्थही गेला व म्हणाला, महाराज, काही शोधताय का? साधू म्हणाला, हो बाबा, माझा कमंडलू शोधतोय. ती व्यक्ती झटकन म्हणाली, पण तुमचा कमंडलू तर झोपडीतच आहे. तो तुम्ही काल बाहेर नेलाच नाही. मग तो बाहेर का शोधताय? साधू म्हणाला, अरे हो, ते मला माहीत आहे कि माझा कमंडलू आतच आहे. पण आत अंधार आहे. अंधारात गोष्टी कशा बरे मिळणार? बाहेर उजेड आहे म्हणून बाहेर शोधतोय. ती व्यक्ती कपाळावर हात मारून म्हणाली, महाराज, मला वाटत होते कि आपण सुज्ञ आहात. आत एक मेणबत्ती, दिवा लावा की! साधू मोठ्याने हसून म्हणाला, अरे, तेच मी तुला सकाळी सांगत होतो. शांति तुझ्या अस्तित्वात आतच आहे कि. बाहेर का शोधत आहेस?

सुख, शांति इत्यादि सगळ्या गोष्टी आत्म्याशी संलग्न आहेत. अहंशी नाहीत. ही जाणिव एकदा झाली कि सगळा खेळ एका क्षणाचाच तर आहे.

# आश्रम वार्ता

## (१) नव्या शक्तीपीठाचे निर्माण





शक्तीपीठ हा आपल्या देवरूख आश्रमातील महत्वाचा भाग. स्वामी मंदिराच्या डाव्या बाजूला असलेले शक्तीपीठ हा मठाच्या मूळ जागेचा शक्ती स्त्रोत आहे. गेली काही वर्षे त्या स्थानावर कामाक्षी देवीचे दक्षिणमुखी देऊळ बांधायचे गुरुजींच्या मनात होते. त्याच ठिकाणी आता मंदिराची उभारणी सुरू झाली आहे. त्या मंदिरात खास गोव्यातील कामाक्षी देवतेच्या शिल्पकाराकडून बनवलेली मूर्ति बसवण्याची योजना आता झालेली आहे.

## (२) इनर व्हील्स, बंगलुरूसाठी गुरुजींचे व्याख्यान

इनर व्हील्स इंटरनॅशनल ह्या जागतिक महिला संघट्नेच्या चेन्नई येथील २७३ क्रमांकाच्या इनर व्हील्स क्लब तर्फे गुरूजींचे रेकि व महिला याविषयी एक व्याख्यान ऑन-लाईन झूमच्या ॲपवर दिनांक २२ डिसेंबर रोजी आयोजित करण्यात आले होते. १०५ देशात कार्यरत असणाऱ्या ह्या संस्थेची भारतात साधारण १२७ शाखा आहेत व साधारण १५०० महिला सदस्या आहेत. सकाळी ११ वाजता आयोजित केलेले हे व्याख्यान उपस्थित महिलांना अतिशय आवडले. रेकि, तिची वैशिष्ट्ये, महिलांसाठी रेकिचा वापर कसा करता येईल इत्यादि गोष्टी गुरूजींनी उपस्थितांना समजावून सांगितल्या.





## (४)DSPPLने आयोजित केलेला '३ SRB and Refining Exercises"चा कार्यक्रम

२७ डिसेंबर २०२०, डी. एस. पी. पी. एल. या संस्थेने ३ स्टेप ह्रिदमिक ब्रिदिंग प्रक्रिया हा कार्यक्रम आपले विद्यार्थी, पालक व शिक्षक यांच्यासाठी आयोजित केला होता. नव्या पिढीचा आपल्या भावनांवर ताबा ठेवण्यासाठी कै. तावरियाजी या आधुनिक काळातील संताने बनवलेली ही प्रक्रिया खूपच लाभदायी ठरणार आहे. तावरियाजींचे शिष्य आणि ह्या परंपरेतील एक ज्येष्ठ प्रशिक्षक श्री राजन वकील यांनी ही प्रक्रिया समजावून सांगितली.



# (५) देवरूख आश्रमातील दत्त जयंति उत्सव

दिनांक २९ डिसेंबर २०२० रोजी श्री दत्त जयंतिचा उत्सव देवरूख आश्रमात नेहमीप्रमाणेच थाटामाटात परंतु कोरोनाच्या नियंत्रित वातावरणातील नियमांनुसार साजरा करण्यात आला. नियंत्रित प्रवेश नियमांमुळे ह्या वर्षी केवळ ३० आमंत्रित प्रमुख सेवेकऱ्यांनी ह्या उत्सवात भाग घेतला. दत्त जयंतिच्या दिवशी म्हणजे २९ डिसेंबर रोजी सकाळच्या वेळेत छोटासा दत्तयाग करण्यात आला. दत्त जयंतिच्या निमित्ताने सर्व प्रमुख सेवेकऱ्यांसाठी गुरूजींनी एक “प्रशिक्षण शिबिर” आयोजित केले होते.









# आश्रम स्पंदन




श्री स्वामी समर्थ म्हणजे प्रत्यक्ष प्रभू श्री दत्तात्रेयांचा पूर्णावतार. त्यांचे संपूर्ण चरित्रच चमत्कारांनी भरलेले. सामान्य माणसांच्या दृष्टीतून पहाता परमेश्वराची प्रत्येक गोष्टच चमत्कार म्हणावा लागतो. प्रत्येक झाडाच्या एक–एक पानापासून, आकाशात चमकणाऱ्या प्रत्येक ताऱ्यापर्यंत सगळा काही चमत्कारच. परमेश्वरी अवताराची प्रत्येक कृति चमत्काराने भरलेली असते.

श्री स्वामी समर्थांच्या लीला वर्णन करणे हे तसे पहाता अशक्यच कर्म. मानवी क्षमतेच्या मर्यादा व्यक्त करणाऱ्या ह्या अशा चमत्कारांनी सामान्य माणूस जर भारुन गेला तर त्यात आश्चर्य वाटण्याजोगे काहीच नाही. परमेश्वरी अवतार आणि संत–महंत हे असे चमत्कार करतात सामान्य माणसांना – जे व्यावहारिक चिखलात लडबडले आहेत त्यांना – परमार्थाच्या मार्गावर चालविण्यासाठी. जसे गेल्या काही वर्षांत चमत्कार करणारे श्री सत्यसाईबाबा एकदा म्हणाले कि प्रत्येक वेळी मी जो चमत्कार करतो, हात हलवून हातातून विभूती काढतो, त्या त्या वेळी चाळीस – पन्नास हजार सामान्य जन ह्या अध्यात्मिक मार्गाकडे आकर्षिले जातात. हे चमत्कार त्यांच्यासाठी असतात जे स्व–ज्ञानाने ह्या मार्गाकडे

वळणे शक्य नाही. ज्ञानी साधकाला एकतर चमत्कारांची गरज नाही असे म्हणा अथवा चमत्कारांनी भरलेल्या मार्गावरून तो वाट काढत आपल्या अंतिम ध्येयाकडे पोहोचू पहात असतो.

जसे हिमालायात अमरनाथ यात्रा करताना प्रचंड सृष्टीसौंदर्य दिसते. अगदी दिपवणारे, पायांना खिळवून राहणारे सौंदर्य. असे वाटते कि हलूच नये येथून. बसून रहावे. विरघळून जावे ह्या वातावरणात. परंतु तसे करता, आपण श्री अमरनाथाच्या गुहेत कधीच पोहोचू शकणार नाही. ज्याची आस लागली आहे, त्याला कधीच भेटू शकणार नाही. म्हणून ह्या सौदर्याच्या मार्गावर. सौंदर्याचे आकंठपान करत, करत पुढे सरकायला हवे. ही तर मार्गावरची साधने आहेत. साधनांचे कौतुक करता करता, साध्यापासून दूर जाणे काही उचित नाही.

साधकांनी स्वामीभक्तांनी श्री स्वामी समर्थांच्या ह्या चमत्कृतिंचा अर्थ समजायला हवा. लोकांनी आपल्या चमत्कारांनी भारून जाऊन आपला उदो-उदो करावा असे श्री स्वामी समर्थांनी कधीच मानले नाही. उलट साधनेच्या मार्गावर पुढे सरकणारा साधक ह्या मार्गावर अडकतो आहे किंवा ह्या मार्गाच्या मुळ उद्दीष्टांपासून सरकतो आहे हे स्वामींना कधीच आवडले नाही. श्री स्वामींच्या चरित्रात त्यांच्या आणि त्यांचे शिष्य परम सद्गुरू श्रीकृष्ण सरस्वति यांच्या भेटीची एक कथा आहे. ज्यावेळी श्रीकृष्ण सरस्वति त्यांच्या समोर येऊन उभे राहीले त्यावेळी स्वामी त्यांना म्हणाले, “तुमची रंडीबाजी अजून का सुटत नाही?” आसपासच्या साऱ्या भक्तांना आश्चर्य वाटले पण श्रीकृष्ण सरस्वति मात्र केवळ मान खाली घालून उभे राहीले. इतरांना कळेना कि इतके सात्विक वृत्तिचे हे संत अश्या थराला कसे जातील? परंतु सरस्वति मात्र जाणून होते कि त्यांनी कमाविलेल्या आणि ते वापरत असलेल्या सिद्धींबद्दल स्वामी बोलत होते. त्यानंतर त्यांनी स्वामींना वचन दिले कि ह्या सिद्धींचा मी चमत्कारांसाठी उपयोग करणार नाही.

श्री समर्थ नेहमी म्हणायचे, केवळ चमत्कारच बघायचे असतील तर गारुड्यांचे खेळ बघा. माझ्याकडे येऊ नका. मी केलेल्या चमत्कारामधून काही शिकता येत नसेल तर ते चमत्कार पहाण्यात अर्थ नाही. चमत्कार हे केवळ दृष्टांत आहेत, सिद्धांत हे त्याचे बीज आहे. आजकाल गणेशोत्सव, दसरोत्सव ह्या सर्व धार्मिक सणांमधून आपण हेच तर पहात आहोत. अतिशय सुबक, सुंदर, सजावट. वैज्ञानिक चमत्कारांनी सजवलेली आधुनिक यंत्रे-तंत्रे यात भक्त असे गुंतत जातात कि हे सारे ज्यासाठी रचले आहे त्या गजाननाला, त्याच्या मूलतत्वाला विसरून जातात. अमेरिकेसारख्या आधुनिक महासत्ता आपल्या अत्याधुनिक तंत्र-मंत्राच्या चमत्काराने आपल्या दिपवत मूलतत्वांचा आपल्याला विसर पाडतात. पुराणकाळातील अंधश्रद्धांची जागा आता आधुनिक अंधश्रद्धांनी घेतली आहे, एवढे खरे.

श्री स्वामी समर्थांच्या चमत्कृतिपूर्ण आयुष्यामधे त्यांनी जे काही शिकवले त्याची विशेष चर्चा होत नाही. एक कारण म्हणजे सामान्य माणूस केवळ बाह्य कृतींमधे गुंतून पडतो - अज्ञानाने. दुसरे कारण म्हणजे ह्या चमत्कारांचा गाजावाजा शिकण्या-शिकवण्यापेक्षा मोठा असतो.

श्री समर्थांना राग आला कि ते म्हणायचे, “चमत्कार घरा बाहेर ठेवा, त्यांना दूर ठेवा. सिद्धांतांच्या, ज्ञानाच्या सहवासात रहा.” ज्या अनुभवापासून ज्ञान नाही मिळत, आचरले नाही जात, त्या अनुभवांना विशेष अर्थ नाही. मानवी सिद्धांतांची जी काही मूल्ये आहेत त्यांना न सोडता जीवन जगणे हीच तर मुळात साधना.

# आगामी उपक्रमः रेकि शिबिरे

| दिनांक | रेकि शिक्षक | केंद्र/स्थान | श्रेणी | नोंदणीसाठी संपर्क |
|---|---|---|---|---|
| ९ व १० जानेवारी | सीमाताई | राजकोट | १ली | ज्योति सरैय्या (९८२४२९९१५३) |
| ९ व १० जानेवारी | अजित सर/कृपा | बडोदा | २री | चंद्रेशभाई परमार (९९७४७०१२००) |
| १६ व १७ जानेवारी | राकेश कुमार | ठाणे | १ली | गिरीश कर्णिक (९८२०२६०२२९) |
| १६ व १७ जानेवारी | विशाल श्रीधनकर | पुणे | १ली | अमृत कीरपेकर (९९६०१०१०१८) |
| २० व २१ जानेवारी | अजित सर | नाशिक | २री | मोनाली राक्षे (९४२०६९२१३६) |
| २३ व २४ जानेवारी | अजित सर | नाशिक | १ली | मोनाली राक्षे (९४२०६९२१३६) |
| २३ व २४ जानेवारी | भारतिबेन | अहमदाबाद | १ली | किनल पंड्या (९७१४५१५८३९) |
| २३ व २४ जानेवारी | विशाल श्रीधनकर | मुंबई | १ली | विनया सावंत (९००४३२८०१६) |
| २३ व २४ जानेवारी | कल्पिता कीर | रत्नागिरी | १ली | भास्कर गाडगीळ (८७८८६९८९६५) |